# विवेकानंद सेवा मंडळ मलकापूर

## रामकृष्ण मठ पुणे ईशसेवा- २००५ पृष्ठ-१३४-१३५

१९७८ साली श्री.शंखपाळदादांचे वाचनात अनपेक्षितपणे 'श्रीरामकृष्ण चरित्र भाग-१' आल्यानंतर 'इतके दिव्य जीवन असू शकते काय?' ह्या उत्सुकतेपोटी त्यांनी रामकृष्ण-विवेकानंद साहित्याचे एका मागून एक वाचन व अभ्यास केला व केवळ श्रीश्रीठाकुरांची अहेतुक कृपा होऊन १९७९-१९८१ असे शंखपाळदादांनी व श्री.नागोराव वऱ्हाडे यांनी सतत तीन वर्षे श्रीरामकृष्ण जयंतीनिमित्त 'राधाकिसन चाळी'मधे ज्ञानेश्वरी पारायण सप्ताह साजरे केले. चौथ्या वर्षी १९८२ मध्ये भक्तांचे सहकार्यातून रीतसर संस्था रजिस्टर करून आश्रमाचे नियमित कार्य सुरू झाले.

**आश्रमाची स्थापना दि.१ एप्रिल १९८२ रोजी.**

सोसा.रजि.नं. ४५१।१९८२ व बि.पि.टी. ॲक्ट रजि.नं. एफ/५२१/बि.एल.डी.

श्रीमत् स्वामी भूतेशानंदजी महाराज व स्वामी आत्मानंदजी महाराज ह्यांचे बहुमोल मार्गदर्शनाखाली विवेकानंद सेवा मंडळाची स्थापना झाल्यानंतर श्रीमत् स्वामी भाष्यानंदजी महाराज व श्रीमत् स्वामी व्योमरूपानंदजी महाराज ह्यांचे हस्ते श्री.ठाकुर-माँ-स्वामीजींची प्रतिष्ठापना 'सार्वजनिक वाचनालया'तील संस्थेस मिळालेल्या दोन खोल्यांमध्ये करून नियमित पूजा-प्रार्थना, पठन, सत्संग सुरू होऊन आश्रमाचे कार्य सुरू झाले.

जवळजवळ १९ वर्षे ह्या छोट्याश्या टिनशेडमध्ये नियमित पूजा-प्रार्थना, जपध्यान, पठण व उत्सवाच्या माध्यमातून श्रीरामकृष्ण भावधारेचा प्रचार सुरू होता व आम्हाला सांगताना अतिशय अभिमान वाटतो की, ह्याच कार्यातून प्रेरणा घेऊन आमचे केंद्रातील ७ युवकांनी आपले जीवन श्रीरामकृष्णदेवांच्या सेवेसाठी श्रीरामकृष्ण संघामध्ये दिले व आमचे अध्यक्ष श्री.शंखपाळदादा यांना रामकृष्ण मिशनच्या केंद्रीय समितीमध्ये सदस्यपदाचा बहुमोल मान मिळाला.

आता आश्रमाजवळ गावाच्या मध्यवर्ती बस स्टँडसमोर नगरपालिकेकडून ९९ वर्षांच्या लीजवर मिळालेल्या ३७००० स्क्वेअरफूट जागेवर २००१ पासून ६ लाख रुपये खर्चून १४०० स्क्वेअरफूटाचे साधुनिवासाचे बांधकाम पूर्ण झाले आहे. त्यातच सद्य:स्थितीत एका हॉलचा उपयोग करून श्रीश्राठाकुरांची, माताजींची व स्वामीजींच्या प्रतिमेची स्थापना श्रीमत् स्वामी ब्रह्मस्थानंदजी महाराज नागपूर व डॉ.बी.टी.अडवाणीजी भावप्रचार परिषद महाराष्ट्र संयोजक यांचे हस्ते करण्यात आली आहे. समोर छोटेसे गार्डन करून मागील बाजूची वॉल कंपाऊंड (२०० फूट), विहीर, इ. कामावर रु.दीड लाख खर्च करण्यात आला. नियोजित प्लॅनप्रमाणे सेवाकार्याच्या वास्तूच्या पाठीमागे आऊट-हाऊससारखी १२'×१०' ची एक खोली होमियोपॅथी दवाखाना व १२'×२१'चा एक हॉल विद्यार्थी वसतीगृहासाठी बांधून पूर्ण झालेला आहे. त्यावर अंदाजे रु.दीड लाख मंडळाने खर्च केला आहे. ह्या व्यतिरिक्त दीड एकर शेत बसस्टँडच्या पाठीमागे जवळपास १० मिनिटांच्या अंतरावर मंडळाला दान मिळालेले आहे. ह्या सर्व वास्तूंच्या देखरेखीसाठी व्यवस्था म्हणून मंडळाने रु.२ लाख १० हजार बँकेत फिक्स केले आहे. त्यावर दरमहा रु.१९५० एवढे व्याज मिळते.

**उद्दिष्टे:** रामकृष्ण मठ व रामकृष्ण मिशनचे दोन मुख्य मंत्र 'आत्मनो मोक्षार्थं जगद्धिताय च' आणि 'सर्वधर्म समभाव' ही मुख्य उद्दिष्टे असून 'त्याग और सेवा ही जीवन' हे आश्रमाचे बोधवाक्य आहे.

**<u>नित्य-नैमित्तिक आध्यात्मिक कार्य:</u>**

१. नियमित सकाळ-सायंकाळ, पूजा प्रार्थना, जपध्यान, वाचन.
२. शुद्ध एकादशीस रामनाम संकीर्तन.
३. घटस्थापना ते दसरा नवरात्रीत महिषासुरमर्दिनी स्तोत्रपाठ.
४. रामकृष्ण मठ नागपूरवरून प्रकाशित वर्षभराचे सर्व उत्सव साजरे केले जातात.

५. रामकृष्ण मठ व मिशनच्या साधूंना बोलवून वेळोवेळी प्रवचनांचे आयोजन.

६. दरवर्षी एक दिवसीय भक्त मार्गदर्शन शिबिराचे आयोजन.

**सेवाकार्य:**

**शैक्षणिक सेवा:**

१. बालकांवर सुसंस्कार होण्यासाठी दर रविवारी सकाळी ८.३० ते १० बालक संस्कार वर्ग सुरू करून बालकांना विविध विषयांचे मार्गदर्शन दिले जाते. (संख्या नोंदणी ११८ साधारणत: उपस्थिती ८० ते ८५)

२. दरवर्षी १० लेटरबुक, १ पेन, २ पेन्सिली, १ खोडरबर, १ स्केल, १ शार्पनर, १ हनुमान चालीसा, स्वामीजींचे फोटो व सुविचार इत्यादींचा एक संच १०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक सत्राच्या सुरुवातीला वाटला जातो.

३. संस्कृत संभाषण शिबिर (१० दिवसीय) आयोजित करून व संस्कृत प्रथमा दीक्षा द्वितीया दीक्षा (भारत सरकारद्वारा मान्यताप्राप्त) पाठ्यक्रमाचे केंद्र सुरू करून संस्कृत भाषेविषयीचे ज्ञानदानाचे पवित्र कार्य संस्था करते आहे.

४. चित्रप्रदर्शनीच्या माध्यमातून स्वामीजींच्या विचाराचे विद्यार्थ्यांना प्रदर्शन.

५. दर रविवारी सारदा संघाच्या माध्यमातून मुलींना विविध विषयांचे दोन तास मार्गदर्शन.

**वैद्यकीय सेवा:**

१. सोमवार ते शनिवारपर्यंत दररोज सकाळी ८.३० ते ९.३०— १ तास मलकापुरातील प्रसिद्ध होमियोतज्ज्ञ डॉ.बी.एम. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली होमियोपॅथी दवाखाना सुरू आहे.

**सामाजिक सेवा:**

१. श्रीश्री सारदादेवी शतकोत्तर सुवर्णजयंती निमित्त ह्यावर्षी ४८ वृद्ध महिलांना लुगडी वाटप, १५ महिलांना साडी वाटप, २० मुलींना २ महिने शिवणकामाच्या माध्यमातून शिवणकला शिकवली.

२. मलकापूर आश्रमातून वेळोवेळी जवळच्या दाताळा, नरवेल, भुसावळ, फत्तेपूरच्या भक्तांना प्रेरणा देऊन तेथे भावधारेचे प्रचारकार्य व भक्तांची संख्या वाढवण्याचा प्रयत्न सुरू आहे. तेथे पुष्कळदा मठातील साधूंच्या प्रवचनाचा कार्यक्रमसुद्धा आश्रम आयोजित करते.

३. मठातून दीक्षार्थी भक्तांची संख्या ६०० आहे.

४. वेळोवेळी रामकृष्ण मठाच्या साधूंच्या प्रवचनाचा कार्यक्रम आयोजित करून भक्तांना सत्संगाचा लाभ देण्याचे कार्य सुरू आहे. दरवर्षी एक भक्त-मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करून मलकापूरसह बुलढाणा, नांदुरा, भुसावळ, जळगाव, नरवेल, दाताळा, माकोडी इत्यादी ठिकाणच्या दीक्षार्थी भक्तांना सत्संगचा लाभ देण्याचे कार्य सुरू आहे.

५. भविष्यात दोन मजली- खाली ध्यान कक्ष, लेक्चर हॉल आणि वर प्रार्थना मंदिर व गर्भगृह असे श्रीरामकृष्णदेवांचे भव्य मंदिर बांधण्याचा मंडळाचा मानस आहे. तसेच ज्यात होमियोपॅथी दवाखाना, १० विद्यार्थ्यांसाठी निवासी वसतिगृह, वाचनालय व ग्रंथालय यांसाठी एक वास्तू, कार्यालय व पुस्तक विक्रय विभाग असेल अशी एक वास्तू उभारण्याचा मंडळाचा मानस आहे. आश्रमाजवळ असलेल्या दीड एकर शेतात नैसर्गिक उपचार केंद्र व साधनेसाठी ४ कुटी बांधण्याचाही मानस आहे.

**६.** भविष्यात हे मंडळ विवेकानंद बालक संघ, युवा संघ व सारदा संघ यांच्या माध्यमातून तरुणतरुणींवर सुसंस्कार करण्याच्या दृष्टीने जास्तीत जास्त प्रयत्नशील राहील व संस्कृत भाषेचा प्रचार व प्रसाराच्या दृष्टीने जास्तीत जास्त प्रयत्नशील राहील. श्रीरामकृष्ण विवेकानंद व वेदान्त साहित्याचा प्रचार व प्रसार व्हावा ह्या दृष्टिकोनातून मंडळ सर्वात जास्त प्रयत्नशील राहील.